# आयफेल टॉवर



दुसऱ्या महायुद्धाचे दिवस. 1914 साल. 14 जुनला जर्मन सैन्याने पॅरिस ताब्यात घेतले. पॅरिसमधल्या सर्वात महत्त्वाच्या ठिकाणी नाझी झेंडा लावण्यासाठी जर्मन सैन्याची लगबग सुरू होती. कारण पुढच्या दहा दिवसातच जर्मनीचा हुकूमशहा हिटलर पॅरिसमध्ये येणार होता.उलट्या स्वस्तिकाचं चिन्ह असणारा तो अवाढव्य झेंडा कसाबसा सांभाळत काही जर्मन सैनिक त्या उंच टॉवरच्या खाली पोहोचले.पण लवकरच त्यांच्या लक्षात आले हे काम अतिशय कठीण आहे कारण टॉवरवर नेणाऱ्या लिफ्ट्सच्या केबल्स फ्रेंचांनी तोडून टाकल्या होत्या. शेवटी जर्मन सैनिकांनी वरपर्यंत पायी चढत जावून तो अवजड झेंडा फडकवला .पण टॉवरवर असलेल्या वाऱ्याच्या वेगाने तो झेंडाही उडून गेला. त्यामुळे त्या ठिकाणी दुसरा छोट्या आकाराचा झेंडा लावावा लागला. २४ जुनला आलेल्या हिटलरने त्यामुळे टॉवरच्या खालीच थांबणे पसंत केले. 1940 साली अशाप्रकारे बंद झालेला हा टॉवर 1946 साली दुरुस्ती करून परत जनतेसाठी खुला झाला. 1889 साली बांधलेला हा जगप्रसिद्ध आयफेल टॉवर,

# आयफेल टॉवर

पॅरिसमधला सगळ्यात महत्वाचा लँडमार्क. टॉवरचं डिझाईन करणाऱ्या इंजिनियर आणि आर्किटेक्ट गुस्ताव आयफेल यांचंच नाव या टॉवरला देण्यात आलं. तीनशे चोविस मीटर उंच  आणि 1665 पायऱ्या असणारी आयफेल टॉवर पॅरिसमधील एकेकाळची सगळ्यात उंच वास्तू होती. टॉवरच्या बांधणीत रॉट आयर्नचा वापर केला असून 18000 मेटॅलिक पार्ट्स एकमेकांना विशिष्ट आकारात जोडले गेले आहेत. तर या जोडण्यांसाठी जवळपास पंचवीस लाख रिवेट्सचा वापर करण्यात आला आहे. साधारणपणे 60 टन एवढा रंग दर सात वर्षांनी टॉवरला देण्यात येतो. या टॉवरला तीन लेवल्स आहेत. पहिल्या दोन लेवल्सवर  रेस्टॉरंट्स आहेत तर तिसऱ्या लेव्हलवर  युरोपीयन युनियन मधलं हायेस्ट ऑब्झर्वेशन डेक आहे. पहिल्या दोन लेव्हलपर्यंत घेऊन जाणारी पॅसेंजर लिफ्ट दोन कार्सची बनलेली आहे.लिफ्टमधून जेव्हा आपण तिसऱ्या लेवलच्या ऑब्झर्वेशन डेकला येतो, तेव्हा दिसतं  सभोवार पसरलेलं रम्य, सुंदर पॅरिस. सेन नदी व तिच्यावरील पूल, त्याचप्रमाणे तिच्या आजूबाजूच्या वसलेल्या  सुंदर, कलात्मक इमारती, तसंच आर्क द ट्रायंफ, कॉकर्ड स्क्वेअर यासारखी पॅरिसमधील ऐतिहासिक स्थळंही टॉवरवरून फार सुंदर दिसतात. टॉवरवर अनेक गमती घडलेल्या आहेत. 1923साली पिअरे लॅ ब्रिक नावाचा माणूस पैज जिंकण्यासाठी टॉवरच्या स्टेअर्स वरून सायकल चालवत खाली उतरला होता.पुष्कळ छोट्या वैमानिकांनी सुद्धा त्यांचं छोटसं विमान टॉवरच्या कमानी मधून उडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अगदी आत्ता आत्ता, म्हणजे 2008 साली एरिका नावाच्या महिलेने तर चक्क टॉवरला आपला जोडीदार मानले आहे.

1889च्या वर्ल्ड फेअरसाठी म्हणून बांधण्यात आलेल्या आयफेल टॉवरची मुदत खरं म्हणजे 1909 साली संपणार होती. याच  काळात त्याचा कम्युनिकेशन साठी वापर सुरू झाला होता. त्याचप्रमाणे 1914  झाली सुरू झालेल्या पहिल्या महायुद्धात टॉवरवर बसवलेल्या रेडिओ ट्रान्समीटरमुळे फ्रेंचांना जर्मन रेडिओ सिग्नल जॅम करता आले व पॅरिसजवळच्या युद्धात  विजय मिळवता आला. टॉवरवरील पर्यटनामुळे एक विशेष मॉन्यूमेंट असणारे शहर म्हणून पॅरिसची जगात एक वेगळी ओळख निर्माण झाली. पॅरिसमधलं कायम गर्दीचे ठिकाण म्हणून आयफेल टॉवर ओळखला जातो. त्यातून रात्रीच्या अंधारात जवळजवळ वीस हजार दिव्यांनी लखलखणारा आयफेल टॉवर डोळ्यांचे पारणे फेडतो- म्हणूनच दोन मोठी युद्ध झाली,टॉवर पाडण्याचे कित्येक प्रयत्न झाले,विरोधही झाला पण जगभरातल्या सर्व पर्यटकांची लाडकी 'आयर्न लेडी ऑफ पॅरिस' म्हणजेच आयफेल टॉवर अजूनही खंबीर पणे उभी आहे............क्रमश: